
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 16 | ISSUE - 9 | OCTOBER – 2026

इयत्ता सहावी मराठी बालभारती २०१६ व २०२६ पाठ्यपुस्तकांचा तुलनात्मक अभ्यास

सौ. रूपाली महेश रामशेट्टी
संशोधक विद्यार्थी, पीएच. डी. संशोधन सुविधा केंद्र, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

प्रस्तावना



बालकाचा लहानपणापासून जसा जसा विकास होत जातो, तसे ते बालक आपल्या भावना, विचार मातृभाषेतूनच व्यक्त करायला लागते. मानसिक दृष्ट्या साधारणपणे बालक वयाच्या पंधरा सोळाव्या महिन्यापासून बोलायला शिकतो. बोलताना तो मातृभाषा बोलतो. मातृभाषा त्याला कोणीही शिकवलेली नसते तर तो ती अनुकरणातून शिकलेला असतो. नंतर शाळेत वाचायला, लिहायला शिकतो. मातृभाषा विचार व भावना यांच्या आदान प्रदानाचे प्रमुख साधन होय अर्थातच विचार व भावना यांच्या आदान प्रदानाच्या क्षमतेचा विकास करणे हे मातृभाषेच्या अध्यापनाचे प्रमुख उद्दिष्ट असते. त्यामुळे अभ्यासास मराठी हा विषय ठेवण्यात आलेला आहे. मराठी ही आपली मातृभाषा आहे व त्यातून विद्यार्थी कोणकोणते उद्दिष्टे साध्य करतो, कोणकोणत्या क्षमता साध्य करतो हे आपल्याला समजते. पाठ्यपुस्तक उत्तम दर्जाचे असेल तर पुढील प्रमाणे आपल्याला उद्दिष्टे साध्य करता येते.

- विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार करता येतात.
- विद्यार्थ्यांचे भाव विश्व संपन्न करता येते.
- विद्यार्थ्यांची जीवनदृष्टी निकोप करण्याचा प्रयत्न आपण करू शकतो.
- विद्यार्थ्यांची वाङ्मयीन जाण विकसित करता येते.

तसेच त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव वाढीस लावता येते, विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती वाढवता येते, विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती वृद्धिंगत करता येते, विद्यार्थ्यांची वाचन शक्ती वाढवता येते, शैलीदार लेखन ते कसे करतात किंवा ते करण्यासाठी आपण त्यांना प्रवृत्त करू शकतो आणि त्यांना संवेदनशील बनवू शकतो हे सर्व विद्यार्थ्यांमध्ये साध्य करता येते. तसेच त्यांची शब्द संपत्ती विकसित होते आणि झालेली शब्द संपत्ती विकसित झाल्यामुळे त्यांच्या भावना ते व्यक्त करतात. वाचन, लेखन कौशल्ये ही त्यांचे सुधारते या सर्वांचा विचार पाठ्यपुस्तकांमध्ये करण्यात आलेला असतो त्यामुळे पाठ्यपुस्तक हे विद्यार्थ्यांच्या

जीवनामध्ये अत्यंत उपयुक्त असे साधन आहे ज्याद्वारे आपण त्यांचे भाषिक, वाङ्मयीन, अभिरुची असे वेगवेगळे कौशल्ये तपासून पाहत असतो.

उद्दिष्ट्ये

०१ इयत्ता सहावी मराठी बालभारती २०१६ व २०२६ या पाठ्यपुस्तकांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

०२ दोन्ही पुस्तकातील कोणकोणत्या नवनवीन क्षमतांचा विकास करून आणण्यात आलेला आहे त्याचा शोध घेणे.

०३ गद्य व पदयाद्वारे कोणकोणती जीवन कौशल्ये व गाभाभूत घटक विद्यार्थ्यास मिळाली याचा शोध घेणे.

०४ २०१६ पेक्षा २०२६ चे पाठ्यपुस्तक नवीन शैक्षणिक धोरणानुसार कोणते बदल झालेले आहेत त्याचा शोध घेणे.

पाठ्यपुस्तकाचे महत्व

पाठ्यपुस्तकाचे महत्व विद्यार्थ्यांच्या जीवनात एक साधन म्हणून जरी असेल तरी देखील या साधनामुळेच त्यांचा मानसिक, शैक्षणिक, ज्ञानात्मक सर्व प्रकारे विकास होत असतो. त्यामुळे पाठ्यपुस्तक हे अति महत्त्वाचे असते हे आपल्या लक्षात येते. त्यामुळे २०१६ व २०२६ या पाठ्यपुस्तकात नवीन शैक्षणिक धोरणानुसार कोणते बदल झाले हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे म्हणून आपण त्याचा अभ्यास या शोधनिबंधात करणार आहोत.

अनुक्रमाणिका पाहिले असता असे लक्षात येते की २०१६ पेक्षा २०२६ या पाठ्यपुस्तकात गद्य व पद्य यांची संख्या कमी आहे नवलेखक जसे की संदीप खरे, निर्मला देशपांडे, स्वप्ना गोवेकर, प्राध्यापक रामदास केदार, शाहीर कुंदन कांबळे, दिलीप फलटणकर, दिलीप कुलकर्णी अशा नवीन लेखक व कवींना कवयित्रींच्या लेखनास समावेश केलेला आपल्याला दिसतो. २०२६ च्या पुस्तकात एक गद्य पाठ झाला की एक पद्य दिसून येत आहे त्यामुळे पुस्तकात विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देण्यास प्रोत्साहित केलेले दिसून येत आहे.

दोन्ही पुस्तकांचा तुलनात्मक अभ्यास करताना आपण गाभाभूत घटक व जीवन कौशल्ये या दोन्हीचाही विचार यात करणार आहोत ते कशा पद्धतीने आपल्याला दिसून येते ते पुढील प्रमाणे पाहू,

I) **राष्ट्रप्रेम :-** हे मूल्य रुजविताना २०१६ च्या पाठ्यपुस्तकात 'पण थोडा उशीर झाला' तसेच 'आपले परमवीर' हे पाठ दिसून येतात यात कथेच्याद्वारे व माहितीपर आधारित राष्ट्रप्रेम रुजविले आहे पण २०२६ च्या पाठ्यपुस्तकात राष्ट्रप्रेम रुजवण्यासाठी 'राष्ट्रध्वज माझा अभिमान' हा पाठ आहे. यात तो मुलगा वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक कसा मिळवितो याचे वर्णन आले आहे. तसेच 'हा देश माझा' या सेनापती बापट यांच्या कार्यातून देश प्रेम ओसंडून वाहत आहे.

II) **'स्व' ची जाणीव :-** विद्यार्थ्यांच्या अंगी कोणकोणत्या पाठाद्वारे 'स्व' ची जाणीव निर्माण झाली ते पाहू. २०१६ च्या पाठ्यपुस्तकात एकपात्री नाट्य अंकाद्वारे 'मला मोठ व्हायचंय' या पाठातून त्या नाटिकेतील मुलास कोणकोणती आवड आहे व तो त्या दिशेने स्वतः कोणते प्रयोग करतो आहे याची माहिती दिली आहे. त्याद्वारे विद्यार्थी देखील आपली आवड निवड शोधतील. तसेच 'बालसभा' या पाठातून विद्यार्थी बालसभा घेऊन स्वतःच्या अंगचे गुण कसे ओळखतात यात ते स्वतः अध्यक्ष तसेच सभेसाठी आवश्यक घटकांचा विचार करतात असाच विचार विद्यार्थी देखील करणार आहेत. रोजनिशी या पाठाद्वारे आपल्या जीवनात दररोज जे घडते ते आपण कसे लिहावे याचे उदाहरण दिले आहे. त्यामुळे विद्यार्थी आपल्या

आयुष्यात घडणाऱ्या घटना व त्याचा तो स्वतः कसा विचार करतो, त्याचा स्वतःचा दृष्टिकोन, त्याची स्वतःचे मत इत्यादीचा विचार इथे केला जाणार आहे. म्हणून या सर्व पाठाद्वारे 'स्व' ची जाणीव हे जीवन कौशल्य येथे दिसून येते.

सन २०२६ च्या पाठ्यपुस्तकात 'पुस्तक माझा गुरु' या पाठाद्वारे लेखक लहानपणापासून ज्या गोष्टी आवडीने करतो त्यामुळेच तो मोठेपणी मोठा लेखक व कवी होतो म्हणून विद्यार्थी देखील आपली आवड निवड शोधण्याचा प्रयत्न करणार आहेत.

III) **पर्यावरण संरक्षण :-** पर्यावरणाचे महत्त्व ओळखून कोणकोणत्या पाठाद्वारे पर्यावरण संरक्षण दिसून येते ते पाहू - प्रथम २०१६ च्या मराठी पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाहू 'सायकल म्हणते मी आहे ना !' या पाठात सायकल द्वारे प्रदूषण होत नाही त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी सायकल वापरावी हा संदेश इथे देण्यात आला आहे. तसेच 'सुगंधी सृष्टी' या पाठात विविध फुलझाडांची माहिती देऊन विद्यार्थ्यांनी ही सुगंधी सृष्टी जपली पाहिजे हा संदेश इथे दिला आहे. 'मले बाजाराला जायाचं बाई !' या नाटिकेद्वारे प्लास्टिक पिशवीमुळे हवा, माती व पाण्यात कसे प्रदूषण होत आहे हे सविस्तरपणे व मनोरंजक पद्धतीने सांगितले आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी प्रथम प्लास्टिक बंद केले पाहिजे हे विद्यार्थ्यांच्या लक्षात येणार आहे.

२०२६ च्या पाठ्यपुस्तकात कोणकोणत्या पाठाद्वारे पर्यावरण संरक्षण सांगितले आहे ते पाहू – 'आला पाऊस' हे आनंददायी कविता पर्यावरणावर आधारित आहे. तसेच 'रक्षण पर्यावरणाचे' या पाठाद्वारे निसर्गाने मानवाला भरपूर दिले आहे पण मानवाने हव्यासापोटी निसर्गाचा ऱ्हास सुरू केला आहे त्यामुळे मानवासच हानी सोसावी लागणार आहे असा संदेश पाठाद्वारे दिला आहे. ज्यामुळे विद्यार्थी पर्यावरणाचे संरक्षण करणार आहेत. 'आंब्याचा मोहर' या पाठाद्वारे ही निसर्गाची माहिती दिली आहे.

IV) **वैज्ञानिक दृष्टिकोन :-** सध्याचे युग हे विज्ञान युग असल्याकारणाने विद्यार्थ्यांच्या मनात वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करणे अत्यंत आवश्यक आहे व त्याचा विचार पाठामधून, काव्यातून कसा आला आहे ते पाहू - सन २०१६ च्या पाठ्यपुस्तकात सफर मेट्रोची या पाठाद्वारे विज्ञानाचा नवआविष्कार 'मेट्रो ट्रेन' याविषयी माहिती दिली आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे खेड्यात मेट्रो नाही पण पाठाद्वारे मात्र सर्वच विद्यार्थ्यांना मेट्रोची माहिती मिळणार आहे तसेच 'ओळख थोरांची' या पाठाद्वारे विज्ञानाने जे शोध लावले यात हरितक्रांतीचा हा महत्त्वाचा पाठ आहे तो इथे दिला आहे. 'परिवर्तन विचारांचे' या पाठात अजय नावाचा मुलगा सहलीला गेलेला असता ज्या घटना घडल्या त्यात पाल चूकचुकणे, मांजर आडवी जाणे यामुळेच त्याला वाटले की सहल चांगली होणार नाही त्यातच त्याच्या जिवलग मित्राला लागले व गाडी पण बंद पडली हे सर्व शनिवारी सहल काढल्यामुळेच होत आहे असे त्याला वाटले पण या सर्व शंका त्याच्या शिक्षकांनी दूर केल्या व संध्याकाळी सहल परत जाताना विचारले छान झाली ना सहल ? त्यावर अजय म्हणतो हो सर. उगाच मी अंधश्रद्धेत माझे मन नाराज करून बसलो. खूपच छान झाली सहल. आपल्या मनातील अंधश्रद्धेचे विचार देखील कमी करणे हा ही वैज्ञानिक दृष्टिकोनच आहे.

२०२६ च्या पाठ्यपुस्तकात 'प्रकाश यात्री' या काव्याद्वारे विद्यार्थ्यांनी नवतंत्र शिकावे, नवनवीन यंत्र बनवावे हा संदेश दिला आहे तसेच 'संगणकातील परमपूज्य' या पाठात जागतिक कीर्तीचे संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भाटकर यांच्या मुलाखतीतून संगणकाची माहिती सांगितली आहे अशाप्रकारे वरील गद्य व पद्य द्वारे वैज्ञानिक दृष्टिकोन दिसून येतो.

V) **समानानुभूती :-** समानानुभूती म्हणजे इतरांच्या ठिकाणी स्वतःला ठेवून त्याच्या भावना समजून घेणे होय हे जीवन कौशल्य विद्यार्थ्यात रुजविणे अति आवश्यक आहे कारण एखाद्याला मदत करण्याची भावना किंवा विनाकारण इतरांना त्रास देणे ही भावना विद्यार्थ्यात उपजणार नाही. गुन्हेगारी प्रवृत्ती कमी होण्यास मदत होईल. असे पाठ २०१६ च्या पाठ्यपुस्तकात कोणते आहेत ते पाहू – 'बाकी वीस रुपयांचं काय ?' या पाठातील मुलगा दवाखान्यात आपल्या आईबरोबर आलेला असताना त्याला समजते की रुग्णासोबतच्या काही व्यक्तीस खायला काहीच मिळत नाही व काही व्यक्ती अन्न जास्त झाले म्हणून टाकून देतात. तेव्हा उपाशी राहणाऱ्या अशा रुग्णासोबतच्या व्यक्तीस अन्न मिळावे म्हणून हा मुलगा गळ्यात पाटी अडकून जास्तीचे अन्न मला द्या मी ज्यांना आवश्यक आहे अशा भुकेल्या गरजू व्यक्तीस देईन असे सांगतो. यावरून या मुलास भुकेल्या व्यक्तीची किती कणव आहे हे समजते तसेच 'नवा पैलू' या पाठात मूकबधीर मुलांची शाळा काढण्यासाठी आजी स्वतःचे शेत विकून पैसे देण्याचे सांगते यावरून तिला तिच्या नातवाबरोबर इतर नातवासारखे मूकबधीर मुलांची किती काळजी आहे हे समजते. 'माय' या काव्यात आई व तिचे बाळ हे निसर्गात समाजात कोठे दिसते तिथे कवीस त्याच्या आईची आठवण येते हे सांगितले आहे.

सन २०२६ च्या पाठ्यपुस्तकात 'धाडसी रोहन' या पाठात वाहत जाणाऱ्या महिलेस शाळकरी विद्यार्थी वाचवितो व त्याला त्या शौर्याबद्दल शौर्य पदक मिळते. त्या वाहत जाणाऱ्या बाईत त्याला त्याच्या आईचेच रूप दिसते. तसेच 'आम्ही असू वेगळे' या काव्यात दिव्यांग मुलाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम उत्पन्न करण्यात आले आहे अशा पद्धतीने समानानुभूती हे जीवन कौशल्य दिसून येते.

VI) **भारतीय संस्कृतिक वारसा जपणे :-** भारतीय संस्कृतीचा वारसा विद्यार्थ्यांना २०१६ च्या पाठ्यपुस्तकात 'वारली चित्रकला' या पाठात वारली या भटक्या आदिवासी जमातीने आपल्या घराबाहेर भिंतीवर काढलेले चित्र हे सध्या अनेक वस्तूवर दिसत आहेत व ही चित्रकलेची परंपरा आजतागायत टिकून ठेवलेली आहे. तसेच 'माझ्या आज्यानं पंज्यानं' या काव्यात पूर्वीपासून कुणबी लोक काय काय काम करतात हे सांगून त्यांनीच आम्हाला शाळेत घातले व तरीदेखील आम्ही हा वारसा पुढेच नेत आहोत असे सांगितले आहे. 'वडिलांस पत्र' या पाठात महाराष्ट्रातील किल्ल्यांची माहिती व हा सांस्कृतिक ठेवा सांगितलेला आहे. तसेच शिवरायांच्या शौर्याबद्दल या पाठात सांगितलं गेलं आहे.

२०२६ च्या पाठ्यपुस्तकात 'सत्य शिवाहुन सुंदर हे' या पद्यातून भारतीय संस्कृतीची महानता सांगितली आहे. तसेच 'भल्लगडी दादा' या काव्यातून शेतीची परंपरा दिसून येते. 'लोकनृत्ये' या डॉ. सरोजिनी बाबर यांच्या पाठातून भारतीय विविध नृत्यकला विषयी माहिती दिली आहे. 'खोप्यामधी खोपा' या काव्यातून अहिराणी भाषेतून खोप्याची विशेषता सांगितली असून माणसाने देखील आपली संस्कृती टिकवण्यासाठी विविध कला कराव्यात असा उद्देश या काव्याद्वारे दिला आहे.

VII) **मराठी भाषा वृद्धिंगत करण्यासाठी आलेले वाङ्मय :-** यात २०१६ पुस्तकात असे वेगळे विषय घेतलेले दिसत नाहीत मात्र २०२६ च्या पाठ्यपुस्तकात पुस्तक माझा गुरु, गीत मराठी गाऊ या हे काव्य दिले आहे. खरी संपत्ती या पाठाद्वारे पुस्तक हीच खरी संपत्ती आहे त्यातून ज्ञान मिळते असे सांगितले आहे. आपली मायबोली मराठी कशी बहरत गेली यासाठी कोणकोणत्या कवी कवयित्रींचा सिंहाचा वाटा आहे हे 'गीत मराठी गाऊ' या काव्यद्वारे सांगितले आहे. तसेच पाठा

खालील उपक्रमात कविता कशी तयार होते व कशी तयार करावी याची विविध उदाहरणे देऊन काव्य लेखनास प्रोत्साहन दिले आहे.

VIII) **बोलींचा अभ्यास :-** महाराष्ट्रातील बोली भाषांचा परिचय होण्यासाठी बोली भाषेचा अभ्यास पुस्तकात दिलेला आहे. यात सन २०१६ मध्ये वऱ्हाडी व मराठवाडी बोली या दोन बोलींची ओळख यात करून दिलेली आहे तसेच सन २०२६ मध्ये मालवणी बोली व वऱ्हाडी बोली यांचा परिचय करून दिला आहे.

IX) **स्वाध्याय व प्रश्नोत्तर यातील वेगळेपण :-** अध्ययन केलेला अभ्यास कितपत विद्यार्थी ग्रहण करतात यासाठी पाठांच्या व काव्याच्या खाली विविध स्वाध्याय दिलेले असतात. यात पूर्वीपेक्षा सध्याच्या पुस्तकात फारच सुधारणा झालेली दिसते व दीर्घोत्तरी प्रश्नोत्तरापेक्षा लघुत्तरी व वस्तुनिष्ठ प्रश्नांचा समावेश जास्त झालेला दिसतो. प्रथमतः २०१६ च्या पाठ्यपुस्तकात स्वाध्यायाचे स्वरूप पाहू - चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा असे लघुत्तरी प्रश्न तसेच तुमच्या शब्दात उत्तरे लिहा हे मुक्तोत्तरी प्रश्न दिलेले येथे आढळतात. या प्रश्नामुळे विद्यार्थ्यांची मते एकमेकांपेक्षा भिन्न असतात व ती या प्रश्नांच्या उत्तराद्वारे दिसून येतात. तसेच दिलेल्या आकृतीद्वारे प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सांगितले आहे. उत्तरातील नेमकेपणा इथे आला पाहिजे म्हणजे वस्तुनिष्ठ प्रश्नांमध्येच याचा समावेश होतो. तसेच भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी दिलेल्या उपक्रमात 'शोध घेऊया, हे करून पहा, खेळूया शब्दांशी, सारे हसूया, वाचा, ओळखा पाहू, विचार करून सांगूया, भाषेची गंमत पाहूया', या शीर्षकाखाली विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतीशीलतेला वाव दिलेला आहे.

सन २०२६ च्या पाठ्यपुस्तकात प्रश्नोत्तराचे स्वरूप कसे आले आहेत ते पाहू - या मराठीच्या पाठ्यपुस्तकात वस्तूनिष्ठ प्रश्न जास्तीत जास्त आलेले आहेत. त्यात खालील आकृती पूर्ण करा, एका वाक्यात उत्तरे लिहा, एका शब्दात उत्तरे लिहा असे वस्तुनिष्ठ प्रश्न जास्तीत जास्त विचारलेले आहेत. विचार करा व सांगा, चर्चा करू या, लिहिते होऊ या, जाणते होऊ या, कृतीतून शिकूया, चला वाचूया, सारे हसू या अशा शीर्षकाखाली विविध उपक्रम देण्यात आलेले आहेत. पाठ्यपुस्तकात पाठ्य घटकांना अनुसरून प्रसंग चित्रे दिलेली आहेत चित्रांची निरीक्षण, त्यावर विचार चर्चा व त्यासंबंधी स्वतःचे अनुभव कथन यातून विद्यार्थी विचार करून उत्तरे देणार आहे. त्यामुळे विचार प्रक्रियेला वाव मिळणार आहे.

वरील मुद्द्यांच्या अभ्यासाद्वारे पुढील निष्कर्ष दिसून येतात ते पुढील प्रमाणे,

०१. दोन्ही पुस्तकात जीवन कौशल्य व गाभा घटक यांचा समावेश असलेली गद्य व पद्य दिसून येतात.

०२. व्याकरणात २०१६ च्या पाठ्यपुस्तकापेक्षा २०२६ च्या पाठ्यपुस्तकात जास्तीचे व्याकरण म्हणजे अलंकाराचा परिचय करून दिला आहे.

०३. २०२६ च्या पाठ्यपुस्तकात पत्रलेखनाचा सविस्तर परिचय करून दिला आहे. त्यात व्यक्तीनुसार मायना तक्ता सांगितलेला आहे.

०४. २०२६ च्या पाठ्यपुस्तकात आणखी एक विशेष बाब म्हणजे दिव्यांग विद्यार्थ्यांचा विचार करून काव्य तर घेतलेच आहे; पण विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्याबाबत साईन लैंग्वेज सांकेतिक गुणांचा भाषेचा वापर करण्यात आलेला आहे.

०५. निबंध लेखन प्रकार सविस्तर दिलेला आहे. निबंध लेखनाचे प्रकारांची सविस्तर माहिती निबंध लेखन यात दिली आहे.

०६. अहवाल लेखन, संवाद लेखन, जोडाक्षरांचे नियम असे उपयोजित मराठीचा भाग प्रथमतः इथे सहावीच्या पाठ्यपुस्तकात समावेशित केलेला आहे.

संदर्भ :-

१. इयत्ता सहावी बालभारती मराठी पाठ्यपुस्तक २०१६
२. इयत्ता सहावी बालभारती मराठी पाठ्यपुस्तक २०२६
३. डॉ. नलिनी पिचड, डॉ. रामदास बरकले मातृभाषा मराठीचे अध्यापनशास्त्रीय विश्लेषण तेजसी प्रकाशन.